# मेट्रो ३ - पहिल्या टप्प्यातील 'ट्रायल रन' दिवाळीच्या मुहूर्तावर

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेच्या आरे येथील कारशेडमध्ये प्रोटोटाईप ट्रेनच्या माध्यमातून ट्रायल रन सुरू असून, पहिल्या टप्प्यातील ट्रायल रन दिवाळीच्या मुहूर्तावर सुरू होण्याची शक्यता आहे.

मेट्रो ३ मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी या मार्गाचे लोकार्पण लवकरात लवकर व्हावे, यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन प्रयत्नशील आहे. त्यामुळे बीकेसी ते आरेदरम्यान ट्रेनच्या चाचण्या सुरू करण्यात येणार आहे. सध्या आंध्र पदेशमधून आरे येथे सध्या ८ मेट्रो ॲक्वा ट्रेन दाखल झाल्या आहेत. सध्या पहिल्या टप्प्यातील ट्रॅक पूर्णत्वाचे काम सुरू असून, दोन्ही बाजूला ओव्हरहेड वायर्स चार्ज करण्यात येणार आहेत. काही ठिकाणी टॅकचे काम अजूनही अपूर्णावस्थेत असल्याने ट्रायल रन सुरू होणे शिल्लक आहे. जानेवारीपर्यंत पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्यासाठी एमएमआरसीएल प्रयत्नशील आहे. डिसेंबरपर्यंत पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्याचे लक्ष्य एमएमआरसीएलने ठेवले होते, मात्र अजूनही ट्रायल रन



सुरू झालेल्या नाहीत. ट्रायल रन सुरू झाल्यानंतर केंद्रीय रेल्वे सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच लोकार्पण करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी आणखी २ महिन्यांचा कालावधी लागणे अपेक्षित असल्याने नव्या वर्षातच मेट्रो ३ धावणार असल्याचे दिसून आले आहे. काही दिवसांपूर्वीच एमएमआरसीएलने एमआयडीसीपासून ते विद्यानगरी मेट्रो स्थानक आणि पुन्हा सिप्झ पर्यंत १७ किमी मार्गावर ट्रायल रन पार पडली. यापूर्वी ऑगस्ट २०२२ मध्ये सारीपूत नगर आरे ते मरोळ दरम्यान ३ किमी दरम्यान ट्रायल रन घेण्यात आली होती. आता ८ ट्रेन दाखल झाल्याने त्याही चाचण्या टप्प्या टप्प्याने पार पडणार असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.